# प्रकरण पहिले

## विलास सिंदगीकर यांचे वाङ्मयीन चरित्र

## प्रकरण पहिले

# विलास सिंदगीकर यांचे वाङ्मयीन चरित्र

विलास सिंदगीकर हे सन २००० नंतर वाङ्मय निर्मिती करणारे कलावंत आहेत. त्यांनी प्रामुख्याने कथानिर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले असून कथेबरोबरच त्यांनी कविता लिहिलेली आहे. कवितेमध्ये ते बालकवितांचा प्रांतही हाताळताना दिसतात. या प्रकरणामध्ये सिंदगीकरांच्या जीवन चरित्राबरोबर वाङ्मय लेखनाचा स्थूलमानाने आलेख मांडला आहे. कलावंत आणि साहित्यिक यांचे अतूट नाते असते. कलानिर्मिती करणारा कलावंत ज्या सामाजिक समूहामध्ये वास्तव्य करीत असतो. त्या समूहाचे संस्कार त्याच्या वाङ्मय निर्मितीवर होत असतात. त्यामुळेच एका लेखकाचा अभ्यास करताना त्या लेखकाचे व्यक्तीगत जीवनातील घटनाक्रम जसे महत्त्वाचे ठरतात. त्या बरोबरच त्या कलावंताच्या कलाकृतीमध्ये ते जीवन व्यवहार कसे प्रतिबिंबित झालेले आहेत. त्याचे अन्वेषण करता येऊ शकते. कारण व्यक्तीगत जीवनाने कलाकृतीतील घटनाक्रम व्यक्ती, समाज आणि भाषेद्वारे साकार झालेला असतो. विलास सिंदगीकर हे कलावंत जीवनवादी आशयसूत्र केंद्रवर्ती ठेऊन निर्मिती करताना दिसतात. या स्वरूपाची निर्मिती करण्यासाठी त्यांना कोणत्या प्रेरणा मिळाल्या. त्यांच्या वाङ्मय निर्मितीची वाटचाल कशी झाली. त्यांच्या वाङ्मयीन व्यवहाराची दखल कशी घेतली गेली इत्यादी घटकातून कलावंताच्या चरित्रावर प्रकाश पडू शकतो.

महाराष्ट्र राज्य हे सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोनातून आघाडीवर असणारे राज्य म्हणून सर्वपरिचित आहे. दर्जेदार मराठी साहित्य निर्मिती आणि गुणसंपन्न अशा साहित्यिकांची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. या महाराष्ट्राचा प्रादेशिक विभाग मराठवाडा दुष्काळी-अवर्षण ग्रस्त प्रदेश म्हणून ओखळला जातो. दक्षिण मराठवाड्याच्या आंध्रसीमेला असणारे जुन्या उदगीर तालुक्यातील (आता नवनिर्मित जळकोट), लातूर जिल्ह्यातील केकत सिंदगी या छोट्याशा गावी दिनांक ५-६-१९७० विलास सिंदगीकर नावाच्या एका उमद्या तरूण लेखकाचा जन्म झाल्याची कागदोपत्री नोंद असली तरी ती तारीख अंदाजे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

टाकलेली असल्याचे लेखकाचे मत आहे. त्यांचे पूर्ण नाव विलास कोंडीबा सिंदगीकर असे आहे. आपल्या जन्माविषयीच्या प्रसंगाबद्दल सांगताना ते म्हणतात, "माझा जन्म झाल्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती. त्यांनी मला निळ आणून लावली होती."[२] म्हणजेच त्यांची खरी जन्मतारीख १४ एप्रिल ही होती. तरी शाळेत नोंदविलेली तारीख ५ जून अशी आहे. आई-वडील अशिक्षित असल्यामुळे जन्म तारखेचा हा अनुभव सर्वत्र जाणवतो. सिंदगीकर यांनी आपले आडनाव गावाच्या नावावरून लावलेले दिसते. मात्र त्याविषयी लेखक काही भाष्य करत नाही. त्यांच्या जन्म गावाचे नाव केकत सिंदगी असे असून केकत सिंदगी या छोट्याशा खेडेगावाचा उल्लेख करीत असताना मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढ्यात शहीद झालेल्या पोलिस इन्स्पेक्टर भुरेवारचा इतिहास सांगितला जातो. आधुनिक सुख-सुविधांपासून वंचित असलेल्या या छोट्याशा गावाशी तेथील मातीशी एकरूप होऊन त्यांनी आपल्या या प्रदेशाला कलाकृतीतून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

विलास सिंदगीकर यांचे जन्मगाव इतर खेड्याप्रमाणेच गुण वैशिष्ट्य, रूढी-परंपरा, चालीरीती सांभाळणारे आहे. जे गाव आधुनिक सुख-सुविधांपासून वंचित आहे. त्यामुळे लेखकाच्या घरची परिस्थिती अतिशय हालाखीची होती. साधे घर आणि जमीन नसणाऱ्या कुटुंबामध्ये लेखक लहानाचे मोठे झाले. सिंदगीकरांचे वडील कोंडीबा अर्जून सिंदगीकर हे मोलमजूरी करीत तर आई शेवंताबाई कोंडीबा सिंदगीकर या लोकांच्या शेतात जाऊन निदंण-खुरपण करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवित होत्या. त्यांचे वडील कोंडीबा व आई शेवंताबाई हे दोघे जरी अशिक्षित असले तरी आपल्या मुलांनी शिकावे असे त्यांना मनापासून वाटत असे त्यामुळे आर्थिक परिस्थिती बिकट असताना देखील त्यांनी आपल्या मुलांचे शिक्षण पूर्ण केले. आपल्या मुलाची प्राथमिक शिक्षणातील हुशारी पाहूणच त्यांच्या वडिलांनी त्यांना माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहात ठेवले. त्यांचे माध्यमिक शिक्षण नीति निकेतन विद्यालय, जांव बु. ता.मुखेड येथे पूर्ण केले, तर पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षण उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे घेतले. तसेच के.जे.सोमय्या कॉंप्रेहेन्सीव्ह कॉलेज ऑफ एज्युकेशन, मुंबई येथून बी.एड्. पदवी प्राप्त केली. आई-वडिलांच्या

स्वप्नांची पूर्ती करत असतानाचा त्यांचे वडील कोंडीबा सिंदगीकर व थोरले बंधू केशव सिंदगीकर यांचे निधन झाल्याने त्यांची हालाखीची परिस्थिती झाली. अशा परिस्थितीमध्ये विलास सिंदगीकरांच्यावर घराची व संसाराची जबाबदारी पडली. इथून पुढे खऱ्या अर्थाने त्यांच्या संघर्षमय जीवनाला सुरुवात झाली. अशा बिकट परिस्थितीवरती देखील न डगमगता लेखकाने मात केली आणि एम.ए., बी.एड्. (इंग्रजी) पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडनीमागे प्रेरणाशील महत्त्वाचे असतात. कारण प्रेरणा या माणसाला क्रियाशील बनवतात आणि या क्रियाशिलतेच्या आधारे माणूस आयुष्यात काही तरी इतरांपेक्षा वेगळे निर्माण करावयाचा प्रयत्न करतो. या क्रियाशिलतेच्या माध्यमातून तो निर्भयपणे आपले वैचारिक विश्व निर्माण करीत असतो. त्यामुळे प्रेरणा ह्या व्यक्तिगत आणि सार्वत्रिक जीवनासाठी आवश्यक असतात. त्यातूनच व्यक्ती अथवा कलावंताला स्वत:ची ओळख होते. त्यामुळे प्रेरणांचा विचार करता "प्रेरणा म्हणजे एखाद्या महापुरूषाचे तत्त्वज्ञान आणि विचार यामधून होणारी जागृती."[३] अशी व्याख्या डॉ.सुशीला ढगे यांनी केली आहे. कलावंत अशा प्रेरणांच्या आधारेच स्वत:ची एक भूमिका घेऊन वाङ्मयनिर्मिती करत असतो. तात्पर्य प्रेरणा नसेल तर कलावंताला स्वत:ची भूमिका प्राप्त होत नाही. त्यामुळे भूमिकाहीन लेखक कल्पनाजन्य होण्याची शक्यता असते. सिंदगीकर यांच्या लेखनामागे निश्चित एक भूमिका असून ही भूमिका त्यांना बुद्ध, म.फुले, शाहू, आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातूनच मिळालेली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानांनी प्रेरित होऊन त्यांनी आपले लेखन शब्दांकित केले आहे. म. फुल्यांना चार्तुवर्णीय समाजव्यवस्थेमधील जाती संस्था मान्य नव्हती. त्याचप्रमाणे त्यांनी हिंदूधर्मग्रंथावर कडाडून हल्ला चढविला होता. त्यांनी 'मनुस्मृती' म्हणजे जातिभेदाची विषवल्ली! ही विषवल्ली नामशेष केल्याशिवाय हिंदू समाजाला उन्नती व उत्कर्षाचा मार्ग सापडणार नाही."[४] अशी स्पष्ट भूमिका महात्मा फुले यांनी मांडलेली दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख करीत असताना स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्यव्यवस्था महत्त्वाची मानली जाते. त्यांनी हे तत्त्वज्ञान बौद्धधर्मातून घेतल्याचे दिसून येते. या तत्त्वज्ञानाच्या आधारावरतीच त्यांनी दलित-पददलित समाजाला न्याय, प्रतिष्ठा

मिळवून देण्यासाठीच सातत्याने संघर्ष केल्याचे दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेच्या बाबतीत दत्ता भगत म्हणतात की, "आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाद्वारे स्वत:ला जाणून घेण्याचा उत्कट इच्छा शक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य."[५] वरील व्याख्या दलित साहित्याची असली तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि तत्त्वज्ञान दलित साहित्याच्या निर्मितीला प्रेरक ठरले. याची स्पष्टता यातून होते. विलास सिंदगीकर एकाच वेळी दलित आणि ग्रामीण जाणिवेचा आविष्कार घडवित असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयनिर्मितीच्या केंद्रस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान, विचार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, विचार विलास सिंदगीकरांच्या कथेत प्रकट झालेले आहे. आपल्या साहित्याच्या माध्यमातून सिंदगीकर हे भूतकाळाच्या अंधाराच्या काळोखातून बाहेर पडून प्रकाशमयी वर्तमान आणि भविष्यकालीन जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती आहे. समाजाचे प्रतिबिंब साहित्याच्या माध्यमातून प्रतिबिंबित होत असते. लेखक समाजामध्ये वावरत असताना निरीक्षणातून तो प्रत्येक घटनेकडे, अनुभवाकडे नव्या दृष्टीने पाहतो. साहित्याची निर्मिती करीत असताना आत्मशोध, जीवनशोध हा त्याचा हेतू असतो. सिंदगीकरांना समाजाबद्दल आत्मियता होती. एक प्रकारची तळमळ होती आणि त्याचा परिणाम त्यांच्या लेखणीवर झालेला दिसून येतो. साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यासारख्या जेष्ठ साहित्यिकाचे साहित्य त्यांनी सुरुवातीपासून वाचले आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्यात लेखनाची आवड निर्माण झाली. साठे यांच्या साहित्याने त्यांच्या जीवनाला उभारी दिली. त्यामुळे त्यांच्यातला एक प्रतिभावंत जागा झाला. अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, "अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याने माझ्यातील साहित्यिक जागा झाला. शब्दांची ओळख झाली मग मी शब्दाला शब्द जुळवत गेलो अन् मी कविता कथा लिहू लागलो."[६] उपरोक्त विधानावरून असे लक्षात येते की, विलास सिंदगीकर यांच्या लेखनावरती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर म.फुले यांचा प्रभाव होता. अशा विचाराने प्रेरित झालेले सिंदगीकर अण्णा भाऊ साठे यांच्या

लेखनाने निर्मितीक्षम बनले. हे विचारात घेणे आवश्यक आहे.

अस्पृश्य समाजात जन्माला आलेल्या सिंदगीकरांनी परंपरेने चालत आलेले शापित जीवन बाजूला सारूण शिक्षणाच्या आणि आपल्या स्वतंत्र पुरोगामी विचारांच्या आधारावरती त्यांनी बदलत्या काळानुरूप काही नवीन करून दाखविण्याचा प्रयत्न साहित्याच्या माध्यमातून केला. परिवर्तनाची मुहूर्त मेढ लेखणीतून रोवली. गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील वास्तव जीवनाच्या अगदी जवळ जाऊन जे अनुभवले, जगले, भोगले ते सच्चेपणाने अभिव्यक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून येते.

मराठी साहित्यविश्वामध्ये १९६० नंतर निर्माण झालेल्या वेगवेगळ्या साहित्यप्रवाहामध्ये दलित साहित्यप्रवाहाचे महत्त्व निश्चितच मोलाचे आहे. या साहित्यप्रवाहामध्ये १९९० हा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखला जातो. कारण या टप्प्यामध्ये अनेक तरूण लेखक लेखन करीत होते. यामध्ये विलास सिंदगीकर हे एक महत्त्वाचे लेखक ठरतात. त्यांच्या साहित्यलेखनाच्या दृष्टिकोनातून विचार करता विलास सिंदगीकरांचे साहित्यविश्व अल्प असले तरी ते गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून बहुमूल्य असे आहे. त्यांचे साहित्य दलित असले तरी ते ग्रामव्यवस्थेला स्पर्श करून जाणारे आहे. ज्या समाजामध्ये लेखक वावरतो. लहानाचा मोठा होतो. तोच समाज त्यांच्या लेखणीचे साहित्यसंपदेचे भरण पोषण करतो. सिंदगीकरांनी कथा, कविता, बालवाङ्मय या क्षेत्रात आपला ठसा उमठविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. विलास सिंदगीकर हे पददलित समाजात जन्माला आले असले तरी त्यांनी ग्रामीण-दलित-आदिवासी जीवनातील वास्तवतेला परिस्पर्श केलेला आहे, आणि या वास्तवजीवनाला वाचकांसमोर मांडण्यासाठी त्यांनी 'कथा' या वाङ्मय प्रकाराचा आधार घेतलेला दिसून येतो. एक नवोदित लेखक म्हणून त्यांनी कथेच्या माध्यमातून आपल्या वास्तवजीवनाला, समाजातील वास्तव प्रश्नांना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे अनुक्रमे तीन कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसून येतात.

'भूकबळी' हा पहिला कथासंग्रह २१ एप्रिल २००३ मध्ये प्रकाशित झालेला आहे. 'भूकबळी' हा कथासंग्रह म्हणजे एक नवोदित लेखक म्हणून स्वत:चे स्थान निर्माण

करण्याचा चाललेला प्रयत्न होय. त्याचप्रमाणे उपेक्षितांच्या वास्तववादी जीवनाला अभिव्यक्त करणारा हा कथासंग्रह असल्याचे दिसून येते. या कथासंग्रहाचे विशेष म्हणजे अ.भा. अण्णा भाऊ साठे साहित्यसंमेलनात जळकोट, जि.लातूर येथे संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.रावसाहेब कसबे या सुप्रसिद्ध विचारवंताच्या हस्ते प्रकाशित झालेला आहे.

विलास सिंदगीकरांचा 'गारपीट' हा दुसरा कथासंग्रह २८ नोंव्हेबर २००५ साली प्रकाशित झाला. सामाजिक वास्तवाला भिडणारा कथासंग्रह म्हणजे 'गारपीट' असा त्याचा उल्लेख करावा लागेल. बहुजन समाजातील अठरा पगड जातींना त्यांच्या प्रश्नांना, वास्तवावर पाय घट्ट रोवून वर्तमानकालीन कोळखगर्भाचे चित्रण सिंदगीकरांनी केलेले आहे. 'उतरंड' हा तिसरा कथासंग्रह मार्च २००८ मध्ये प्रकाशित झालेला आहे. विषम समाजव्यवस्थेमधील विदारक व वास्तव दर्शन घडविण्याचा प्रयत्न या कलाकृतीच्या माध्यमातून त्यांनी केलेला दिसून येतो. कथासंग्रहातील प्रत्येक कथेमधून त्यांनी समाज जीवनाला भेडसावणारे प्रश्न, समस्या ज्या मांडल्या आहेत. त्या ज्वलंत आणि समाज परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा वाटतात. संवेदनशील भावनेने जे साहित्य लेखन केले त्यामध्ये त्याचे साहित्य कुठेही प्रक्षोभक, भडक हे दोष निर्माण करीत नाही. हे त्यांच्या कथालेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते.

विलास सिंदगीकर हे जरी कथाकथनकार म्हणून सर्व परिचित असले तरी ते उत्तम कवीदेखील आहेत. कथेच्या मळलेल्या जुनाट वाटेने वाटचाल करीत असतानाच त्यांनी काव्यलेखन देखील मोठ्याप्रमाणात केल्याचे दिसून येते. त्यांचा 'ढगा ढगा धाव रे' हा बालकाव्यसंग्रह म्हणजे लहान मुलांसाठी एक नवी पर्वणीच ठरते. हा काव्यसंग्रह इसाप प्रकाशन, नांदेड च्या वतीने मार्च २००९ मध्ये प्रकाशित झालेला आहे. या बालकाव्यसंग्रहाचा समग्रपणे विचार करता विलास सिंदगीकरांची निसर्गाबद्दलची ओढ, आपुलकी आणि मुलांमध्ये रमून जाण्याची वृत्ती दिसून येते. सिंदगीकर हे जरी परिवर्तनवादी लेखक असले तरी ते एक निसर्ग कवी आहेत. असे ही म्हणावे लागले. त्यांचा 'ढगा ढगा धाव रे' हा काव्यसंग्रह म्हणजे वाचकाला आपल्या बालपणीच्या आठवणींच्या विश्वात नेवून ठेवतो. वाचक ही कविता वाचत असताना बाल होऊन स्वत:हून स्वप्नांच्या विश्वातून संचार करताना दिसतो. लहान

मुलांसाठी विलास सिंदगीकर हे सिंदगीकर काका बनतात. निसर्गाच्या सहाय्याने लहान मुलांना आपल्याकडे आकर्षित करून घेतात.

'गीत निळ्या आकाशाचे' हा दुसरा काव्यसंग्रह हा संगत प्रकाशनाच्या वतीने ६ डिसेंबर २००९ मध्ये प्रकाशित झालेला आहे. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी आपल्या पददलित समाजाचा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला अवमानित इतिहास त्यांनी या काव्यसंग्रहामध्ये मांडलेला दिसून येतो. त्यांच्या या काव्यसंग्रहामध्ये आंबेडकरी प्रेरणा असल्याचे जाणवते. सिंदगीकरांनी ढोंगी समाजाचे बेरकी रूप या कवितासंग्रहामधील 'राजहंस' या कवितेमधून वाचकांसमोर उभे करतात आणि एका प्रश्नावलीच्या माध्यमातून सडेतोड भूमिका घेऊन समाजाकडून उत्तराची अपेक्षाही करताना दिसतात. ते म्हणतात,

> "मुलतत्त्ववाद्यांनो, नमाज-आरत्या घेऊन
> भोळ्या समाजात धूर्तपणे फिरता कशाला?
> निरागस समाजाला देवधर्माचं झिंग पाजून
> गरीबांना कस्तुरी मृगावाणी झुलवत ठेवता कशाला ?
> अरे, तुम्ही माणसांची माथे भडकावून,
> दिवसा-बेरात्री दंगली पेटवता कशाला ?
> अन् मस्जिद-मंदिराचे विझते निखारे,
> मग जीवघेणे धुमसत ठेवता कशाला ?
> तुम्ही निखाऱ्यावरची राख फुंकून,
> खाजवून आगलावेपणा करता कशाला ?
> ढोंगीपणे भगवे-हिरवे कपडे घालून,
> निष्पाप मूळ 'राजहंस' मारता कशाला?"[७]

त्याचप्रमाणे त्यांनी आधुनिक काळात चालत असलेले हुंडाबळी, देहविक्रय करणारी स्त्री, आई च्या पोटात असुरक्षित असणारी उदयाची स्त्री, भ्रष्ट स्वार्थी राजकारण यासारख्या समाजाला

ग्रासलेल्या समस्येचे चित्रण यासारखे विषय त्यांनी आपल्या काव्यलेखनातून घेतल्याचे दिसून येते.

सिंदगीकरांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून वस्ताद लहूजी सावळे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यासारख्या अजरामर व्यक्तींचा इतिहास सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकूण ५६ कविता असणाऱ्या या काव्यसंग्रहात त्यांनी प्रत्येक प्रश्नांना, शब्दांच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि शेवटी 'कविता जन्म कशी घेते' ? या विषयी कविता या चारोळीमध्ये ते म्हणतात,

"रात सरूनिया जाते, झुंजूमुंजू होते
पहाटेला पाखराची, कुजबुज कानी येते.
नित्य नियमाने रोज, नवी सकाळ उगवते
सूर्याआधी मनात, नव कविता जन्म घेते."[८]

काव्यनिर्मिती संबंधात त्यांनी लिहिलेली ही कविता म्हणजे साहित्य निर्मितीचा एक उत्तम नमुना म्हणून ओखळता येईल.

सुरुवातीपासूनच दीन, दलित व शेतकरी जीवनाचे प्रभावी चित्रण साहित्यातून व्यक्त करणाऱ्या विलास सिंदगीकरांच्या कार्याचा गौरव वेगवेगळ्या संस्था, संघटनानी केलेला आहे. त्यांना आजपर्यंत एकून सत्तावीस वाङ्मयीन पुरस्कार मिळालेले आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचा ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव बागूल गौरव पुरस्कार (भूकबळी).
- भि.ग.रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार, कोपरगाव जि.अहमदनगर (गारपीट)
- सत्यशोधक दिन मित्रकार मुकुंदराव पाटील वाङ्मय पुरस्कार, तरवडी जि.अहमदनगर (भूकबळी)
- लोकानुकम्पा साहित्य पुरस्कार, नागपूर (भूकबळी / गारपीट)
- समाजप्रबोधन वाङ्मय पुरस्कार, नागपूर (भूकबळी / गारपीट)

- श्री.चक्रधर स्वामी साहित्य पुरस्कार, शेवाळी जि.हिंगोली (गारपीट)
- स्व.बाजीराव पाटील अंकुर साहित्य पुरस्कार अकोला (गारपीट)
- शब्दगंध वाङ्मय पुरस्कार, अहमदनगर (गारपीट)
- अण्णा भाऊ साठे वाङ्मय पुरस्कार आंदेगाव जि.नांदेड (गारपीट / भूकबळी)
- पू.साने गुरूजी सा.वाचनालय कुंटुर जि.नांदेड कै.गंगाबाई मामीडवार वाङ्मयीन पुरस्कार (गारपीट)
- मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी जि.लातूर चा कै. प्रा.लक्ष्मण दांडेकर साहित्य पुरस्कार (गारपीट)
- परिवर्तन वाङ्मय पुरस्कार, नळदुर्ग जि.उस्मानाबाद (भूकबळी)
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा भुषण वाङ्मय पुरस्कार औरंगाबाद (भूकबळी)
- बहुजन विश्वसेवा संघाचा अण्णाभाऊ साठे समाज गौरव पुरस्कार, अंबरनाथ (पू) जि.ठाणे (गारपीट)
- कै. शेषाकाकू भंडे-पाटील उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार, दावणगाव ता.उदगीर, जि.लातूर (उतरंड)
- कै.अमृतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय, नायगाव बाजारचा कै.बळवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार, नायगाव बाजार जि.नांदेड (उतरंड)

त्याचप्रमाणे त्यांच्या कथासंग्रहातील काही कथांना स्पर्धेची पारितोषिकही मिळालेली दिसून येतात. त्यामध्ये 'गारपीट' या कथेला दैनिक गोदातीर समाचार दिवाळी अंक कथा पुरस्कार आणि दै.तरूण भारत अक्षरयात्री कथा पुरस्कार बेळगाव, तर 'टच्चा' या कथेला चार पुरस्कार मिळालेले आहेत. 'पोटाड्या' या कथेस लोकानुकम्पा कथालेखन पुरस्कार तर 'भाकरीचं झाड' या कथेस आदिवासी कथालेखन पुरस्कार मिळालेला आहे. त्याचप्रमाणे 'संपत्याचं लगीन' या विनोदी कथेस सा.आपले जगदिवाळी अंक विनोदी कथा पुरस्कार मिळालेले दिसून येतात.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## निष्कर्ष :

१. १९९० नंतर उदयास आलेल्या विलास सिंदगीकर यांनी वास्तववादी जीवन अभिव्यक्त करणारी वाङ्मय निर्मिती केली आहे.

२. ग्रामीण - दलित साहित्याच्या प्रवाहामधील एक नवोदित लेखक म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

३. विलास सिंदगीकरांनी आपल्या कथांतून गावकुसाच्याआतील आणि गावकुसाबाहेरील सामाजिक समस्या मांडल्या आहेत.

४. विलास सिंदगीकरांनी बालकवितेतून ग्रामीण व दलित बालजीवन मांडले आहे.

## संदर्भ :


१. कोत्तापल्ले, डॉ.नागनाथ - 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती (सुधारीत) २६ जानेवारी २००७. पृ.१२८

२. लोकमत हॅलो लातूर - गुरूवार दि.२९ जाने २००४.

३. ढगे, डॉ.सुशीला 'मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल', सुगावा प्रकाशन, पुणे.३०, प्रथमावृत्ती जून २००४, पृ.९८

४. वाघमारे, डॉ.जनार्दन - 'समाज परिवर्तनाच्या दिशा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १ जाने १९९५, पृ.९७

५. मांडे, प्रभाकर - 'दलित साहित्याचे निराळेपण' धारा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९७९. पृ.२५

६. र.वि.वा.र गांवकरी - औरंगाबाद आणि नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित रविवार, ६ नोव्हेंबर, २००५ वर्ष ३ रे अंक ११५

७. सिंदगीकर, विलास - 'गीत निळ्या आकाशाचे', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, ६ डिसेंबर २००९, पृ.३०

८. तत्रैव - पृ.७९